# प्रेस नोट प्रसिध्दीसाठी

दिनांक ४ सप्टेंबर, २०१८ पासून पोलीस नियंत्रण कक्ष, पुणे शहर येथे आय.व्ही.आर.एस. (इंटरॲक्टीव्ह व्हॉईस रिस्पॉन्स सिस्टीम) ही कार्यप्रणाली १०० नंबर डायल सिस्टीमवर चालू करण्यात आलेली आहे.

या नव्यानेच सुरु करण्यात आलेल्या सिस्टीममुळे १०० नंबर डायलवर येणारे दिवसाचे कॉल जवळपास २५००० ते ३०००० वरुन एकदम १००० ते १५०० एवढयावर आलेले आहेत. त्यामुळे तेथे काम करण्या-या कर्मचा-यांना पूर्वी जवळपास २५० ते ३०० कॉल प्रत्येक शिफ्टमध्ये घ्यावे लागत होते त्याऐवजी आता फक्त १५ ते २० कॉल घ्यावे लागत आहेत. त्यामुळे तेथे काम करण्या-या कर्मचा-यांवरील कामाचा ताण सुध्दा कमी झालेला आहे. तसेच यापूर्वी नागरिकांना १०० नंबर डायल करण्यामध्ये अडचणी येत होत्या तसेच विलंब लागत होता तोही आता दूर झालेला आहे. त्याबाबत नागरिकांनी तसेच १०० नंबर डायल येथील काम करणा-या पोलीस कर्मचा-यांनी त्याबद्दल समाधान व्यक्त केलेले आहे. त्याबाबत नागरीकांनी व पोलीस कर्मचारी यांनी मा.पोलीस आयुक्त, पुणे शहर,मा. सह पोलीस आयुक्त, पुणे शहर, पोलीस उप आयुक्त,मुख्यालय श्री. शेषराव सूर्यवंशी आणि श्री. दीपक हुंबरे, सहा. पोलीस आयुक्त, अभियान, पुणे शहर यांचे अभिनंदन केले आहे.

(शेषराव सूर्यवंशी)
पोलीस उपआयुक्त, मुख्यालय
पुणे शहर

Scanned by CamScanner